# प्रभाग बजेट आणि नगरसेवक

**२९ जून २०१२**

तन्मय कानिटकर

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# प्रभाग बजेट आणि नगरसेवक

प्रभाग स्तरावर नागरिकांकडून कराच्या रूपाने गोळा केलेले पैसे हे कसे आणि कुठे खर्च करायचे? हे लोकशाहीमध्ये कोण ठरविते? कोणी ठरवायला पाहिजे? लोकांनीच ना?

सध्या हे एकतर क्षेत्रीय कार्यालय अधिकारी किंवा मग आयुक्त व त्यांचे सहकारी ठरवून टाकतात? का? लोकांना महितच नाही की त्यांना ठरविण्याचा अधिकार आहे? का आमच्या प्रभागामध्ये कोणती कामे तातडीने व्हायला हवी हे तेथील नागरिकांना विचारलेच जात नाहे?

नागरिकांनी भरघोस मतांनी निवडून दिलेला नगरसेवक- नागरिकांची रास्त अपेक्षा असते की आम्ही ज्या मूलभूत सुविधांसाठी आमच्या कष्टाचे पैसे कर म्हणून इमानेइतबारे वेळच्या वेळी क्षेत्रीय कार्यालयात जाऊन भरतो, त्याबदल्यात आम्हाला आमच्य घराच्या आसपास सोयीसुविधा मिळाव्यात. या नागरिकांच्या गरजेसाठीच तर नगरसेवक आहे !

“विकास” “विकास” जो काय म्हणता तुम्ही, तो पैशांशिवाय होणार आहे का? म्हणून इथे “आपल्या प्रभागाचे बजेट” या विषयात नगरसेवकाने रूची घेणे अतिशय गरजेचे आहे.

नगरसेवकाने आपल्या प्रभागाचे बजेट ठरविण्यासाठी खालील पायऱ्या अवलंबणे गरजेचे आहे

1. **प्रभागाची रचनावैशिष्ट्ये** – सदनिकांचे प्रमाण, व्यवसायिक कार्यालयांचे प्रमाण, विद्यालये, मैदाने, सांस्कृतिक स्थळे, ऐतिहासिक वास्तू
2. **प्रभागातील नागरिकांच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा** – शालेय विद्यार्थ्यांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी, व्यावसायिकांसाठी, विविध श्रेणीतील कामगारांसाठी, महिलांसाठी
3. **नागरिकांना एकत्रितपणे भेडसावणाऱ्या समस्या-** चोरीमारीचे प्रकार, घरफोड्या, रस्ते रोषणाई चा प्रश्न, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, रस्ता रूंदीकरण, रस्त्यांवरचे अतिक्रमण
4. **कामांचे प्राधान्य ठरविणे** – नगरसेवकाने नेतृत्व स्विकारून चर्चा करून नागरिकांच्या समस्या जास्तीत जास्त नागरिकांचे समाधान होईल अशा पद्धतीने सोडविणे.
5. **ठरविलेली कामांचा पिच्छा पुरवून ती करवून घेणे-** येथे नगरसेवकाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवते. सर्वानुमताने ठरलेली कामे पालिकेकडून होत आहेत की नाही याचा आढावा नगरसेवक आपल्या स्तरावर प्रभावीपणे घेऊ शकतो.

## वॉर्ड बजेट बनवताना नगरसेवकाने पुढाकार घेणे का गरजेचे आहे?

अनेकदा असे दिसते की क्षेत्रीय अधिकारी आणि आयुक्त मिळून संपूर्ण शहराचे बजेट बनवून मोकळे होतात. यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग अत्यल्प असतो. असलाच तर तो केवळ सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यापुरता असतो. तसेच नागरिकांचा तर सहभाग अगदी नगण्य असतो, किंवा नसतोच असे म्हणले तरी चालेल. नागरिकांना नगरसेवक आणि महापालिका आपली आहे असे वाटले पाहिजे. या सगळ्या सिस्टीम मध्ये आपल्याला काहीतरी महत्व आहे हे लोकांना जाणवल्याशिवाय कितीही सुधारणा झाली तरी ती तात्पुरती असेल. दर वर्षी महापालिका आपल्याला विचारून कोणती कामे करायची हे ठरवते हा विश्वास नागरिकांच्या मनात निर्माण करणे हे नगरसेवकाच्याच हातात आहे. आणि हे काम करणाऱ्या नगरसेवकाबद्दलही नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण होईल. दर वर्षी हा उपक्रम राबवल्याने नव्याने निर्माण झालेल्या समस्या लक्षात येतील इतकेच नव्हे तर मागच्या वर्षी निर्माण झालेल्या समस्या सुटल्या आहेत की नाहीत याचा आढावा घेता येईल.

शिवाय नागरिकांना हवे तेच काम बजेट मध्ये आल्याने नगरसेवकाची आणि पक्षाची लोकप्रियताही वाढेलच!

## आपण नगरसेवक म्हणून नेमके काय करायला हवे?

### वॉर्डातील प्रश्न शोधणे

प्रथम नगरसेवकाने स्वतः आपल्या प्रभागात पायी हिंडावे, प्रभात फेरी काढून नागरिकांशी चर्चा करावी. आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रभागातले प्रश्न नेमके काय काय आहेत याची यादी बनवावी.अनेक समस्या नगरसेवकाला आधीच माहित असल्या तरी पायी फिरणे, प्रभात फेरी काढणे या गोष्टींमुळे नगरसेवक समस्या जाणून घेऊ इच्छितो, त्यासाठी स्वतः कष्ट घेतो हे “दिसते”. पक्षाच्या आणि नगरसेवकाच्याही प्रगतीसाठी नुसते “असून” उपयोगाचे नाही, ते “दिसले”ही पाहिजे.

## लोकांच्या सूचना मागवणे

1. प्रभागात विविध ठिकाणी नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांचे नेमके प्रश्न काय आहेत काय कामे प्रभागात व्हायला हवी आहेत याविषयी सूचना मागवणे.
2. यावेळी कोणतेही आश्वासन न देता सर्व सूचना लिहून घेऊन त्याची यादी करणे.
3. नगरसेवकाने बनवलेली यादी आणि नागरिकांनी बनवलेली यादी एकत्र करणे.
4. त्यातील बेकायदेशीर सूचना काढून टाकणे.

5. अनेकदा नागरिक काही नियमबाह्य व बेकायदेशीर सूचनाही करतात. त्या या यादीतून काढून टाकणे. सूचना काढून टाकतानाच त्याची कारणे स्पष्टपणे मांडावीत.

## सर्व आवश्यक गोष्टींचे एक पत्रक बनवून जाहीरपणे लोकांसमोर मांडणे

1. सर्व सूचनांचे एक पत्रक बनवणे आणि जाहीरपणे प्रभागात लोकांसमोर वॉर्डसभा घेऊन ते पत्रक प्रसिद्ध करणे.
2. लोकांसमोर मांडणे. त्यांच्या त्यावर हरकती नोंदवून घेणे. हे काम करण्यासाठी मोहल्ला कमिटीच्या मिटींगचा देखील वापर करावा.
3. लोकांसमोर जाहीरपणे गोष्टी मांडण्यासाठी वेबसाईट, सोशल नेटवर्किंग सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा.
4. शिवाय लोकांना माहिती देण्यासाठी फ्लेक्स सारख्या गोष्टींचाही वापर करता येईल. मात्र फ्लेक्स हे पर्यावरण पूरक नसल्याने शक्यतो त्याचा वापर टाळलेला बरा.

## लोकांच्याच सहभागाने कामांचा प्राधान्यक्रम ठरवणे

- प्रभागातील सर्व कामांच्या मागण्यांचे पत्रक लोकांसमोर मांडल्यावर त्यांच्याच सूचना घेऊन कामांचा प्राधान्यक्रम ठरवणे. अत्यावश्यक, आवश्यक अशा पद्धतीने वर्गीकरण करावे. हे सगळे लोकांसामोरच करावे. म्हणजे संपूर्ण पारदर्शकता राहील.
- बजेट मध्ये अंतर्भाव करायच्या गोष्टींचे मागणी पत्रक बनवून क्षेत्रीय अधिकारी, महापालिका आयुक्त आणि गट नेते यांच्याकडे देणे.
- अशा पद्धतीने बनवलेले पत्रक क्षेत्रीय अधिकारी, महापालिका आयुक्त आणि आपल्या पक्षाच्या गट नेत्याकडे द्यावे. तसे ते दिल्याचेही जाहीर करावे.
- अंतिम अंदाजपत्रकात सुचवल्या गेलेल्यांपैकी कोणत्या कामांचा अंतर्भाव करण्यात आला आहे याची माहिती जाहीर करणे
- अंतिम अंदाजपत्रक तयार झाल्यावर आपल्या प्रभागासाठी केलेली तरतूद किती आहे, नागरिकांच्या सहाय्याने दिलेल्या मागणी पत्रकातील किती कामांचा अंतर्भाव करण्यात आला आहे याविषयी एक पत्रक बनवून तेही नागरिकांसमोर मांडावे.
- सुचवलेल्या काही कामांपैकी जी कामे अंतर्भूत केली नसतील ती का अंतर्भूत करण्यात आली नाहीत याबाबतचे अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण घेण्याचा प्रयत्न. तसे स्पष्टीकरण आल्यावर ते नागरिकांसमोर जाहीर करणे.